ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-II ISSUE-VI JUNE 2015

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# पदव्युत्तर स्तरावर संशोधन करणा–या विद्यार्थिनींना येणा–या अडचणी

प्रा.डॉ.माणिक अनंतराव विजापुरे.
महावीर महाविद्यालय,कोल्हापूर
एम.ए, एम.एड.,एम.फिल.,पी.एच.डी.

## प्रस्तावना :–

पदव्युत्तर स्तरावर संशोधन कार्य अनिवार्य असलेल्या विद्यार्थिनींसाठी प्रश्नावली तयार करण्यात आली होती. एम.एड्., एम.बी.ए., एम.सी.ए., एम.सी.एम., एम.एस.डब्लू., एम.फिल. या पदव्यांच्या अभ्यासक्रमाच्या अंशतः परिपूर्तीसाठी संशोधन कार्य अनिवार्य आहे. तसेच पदव्युत्तर स्तरावरील पी.एच.डी. ही संशोधन पदवी आहे.

## विद्यार्थिनींच्या अडचणी :–

प्रश्नावलील्या मिळालेल्या प्रतिसादानुसार विद्यार्थिनीला येणा–या अडचणी

### विद्यार्थिनींला संशोधन करताना अग्रक्रमाने येणा–या अडचणी

| अ.क्र. | अडचणी | विद्यार्थिनी संख्या |
|---|---|---|
| 1 | संशोधनासाठी पुरेसा वेळ उपलब्ध होत नाही | 33.16 % |
| 2 | सामग्री गोळा करताना अडचणी येतात. | 27.72 % |
| 3 | प्रयोगशाळेत अडचणी येतात. | 23.26 % |
| 4 | ग्रंथालयात पुरशी पुस्तके मिळत नाहीत. | 20.97 % |

| | | |
|---|---|---|
| 5 | संशोधनासाठी आर्थिक सहाय्य मिळत नाही. | 13.86 % |
| 6 | संशोधन विषय लादला गेला. | 5.9 % |
| 7 | हवे असलेले मार्गदर्शक मिळाले नाहीत. | 4.4 % |
| 8 | मार्गदर्शकांचे व विद्यार्थिनींचे स्वभाव विचार पटत नाहीत | 1.4 % |

## विद्यार्थिनींना प्रत्यक्ष मुलाखतीच्यावेळी काही नवीन अडचणी मांडल्या :–

1. राहण्याचे ठिकाण, नोकरीचे ठिकाण आणि मार्गदर्शक असल्याचे (राहण्याचे) ठिकाणी यातील जास्त अंतर
2. संशोधनासाठी आवश्यक असणा–या वेळेचा अभाव.
3. मार्गदर्शकांचे पुरेसे सहकार्य मिळत नाही.
4. वयाच्या 40 नंतर संशोधनास सुरूवात केली त्यामुळे उमेद कमी.
5. पी.एच.डी. न मिळालेल्या इतर सहकार्यांचा त्रास.
6. मानसिक स्वास्थ्याचा अभाव.
7. विद्यापीठातील कागदपत्रांची पूर्तता करताना येणा–या अडचणी
8. आर्थिक अडचण जाणवते.

विद्यार्थिनीला संशोधनासाठी अन्य व्यक्तींचे पुरेसे सहकार्य मिळते का ? याची विचारणा केली असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

## संशोधनासाठी मिळणारे सहकार्य

| अ.क. | सहकार्य | विद्यार्थिनीं संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| 1 | मार्गदर्शकांचे सहकार्य | 53.46 % | 45.54 % |
| 2 | प्रतिसादकांचे सहकार्य | 30.69 % | 68.39 % |
| 3 | कुटुंबियांचे सहकार्य | 51.48 % | 47.52 % |

## शिफारशी :–

1. विद्यार्थिनींपेक्षा अधिक अनुभवी, व्यासंगी मार्गदर्शक अध्यापकांनी विद्यार्थिनीला एखादा विषय सुचवावा तथपि, तो लादण्यात येऊ नये आणि विद्यार्थिनींनी देखील संशोधन विषय लादून घेऊ नये.
2. महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके असण्याबद्दल विद्यार्थिनींनी प्रत्यक्ष मुलाखत देताना नाराजी व्यक्त केली. विद्यापिठाने पदव्युत्तर व संशोधन केंद्र सुरू करताना आवश्यक त्या ग्रंथांनी सुसज्ज ग्रंथालय असण्याची अट घालावी. तसेच विद्यार्थिनींना इंटरनेट व वायफाय इ.ची. मोफत सुविधा पुरविण्याची विद्यापिठाने सक्ती करावी.
3. महाविद्यालयाने संबंधित पदव्युत्तर विभागाला संशोधनासाठी आवश्यक असणारी पुरेशी साधनसामग्री वेळेवर उपलब्ध करून द्यावी.
4. मार्गदर्शक अध्यापकांचे सहकार्य मिळत नाही असे म्हणणा–या विद्यार्थिनींनी कठोर आत्मपरिक्षण करावे व नंतर मार्गदर्शक अध्यापकांच्यावर दोषारोप करावेत. तसेच विद्यार्थिनीला संशोधन कार्य करीत असताना कौटुंबिक आर्थिक जबाबदा–या पार पाडाव्या लागतात त्यामुळे मार्गदर्शक अध्यापकांनी विद्यार्थिनीकडे पाहताना सहानुभूतीचा दृष्टिकोन ठेवावा.

5. प्रश्नावली प्रतिसादकांना आवाहन करून, संशोधन समस्येचे महत्व पटवून देऊन प्रतिसाद मिळविता येतो. संशोधक विद्यार्थिनीने चिकाटीने प्रयत्न करावेत असे सुचवावेसे वाटते.
6. ज्या विद्यार्थिनींना त्यांचे कुटुंबिय सहकार्य करीत नाहीत त्यांचे उद्‌बोधन व्हावे असे वाटते. विशेषतः घरकामात सवलत मिळत नाही असे मुलाखतीमध्ये विद्यार्थिनींनी सांगितले. वास्तविक उच्चशिक्षीत कन्या, पत्नी, स्नुषा ही कुटुंबाचे भूषण आहे याची जाणीव या कुटुंबातील सदस्यांना करून द्यायला हवी असे वाटते.

## संदर्भ :–


1. उपासनी ना.के.: 'शैक्षणिक कृतिसंशोधन स्वरूप साधने व कार्यपध्दती (पुणे : महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मीती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ) 1962.
2. John W.Best and James V. Khan, “Research in Education ,(7 th Edition, New Delhi : Prentice Hall of India),1996